महाराष्ट्र अभियांत्रिकी (यांत्रिकी) सेवा परिक्षा २०१४ मधील सहायक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी) गट-ब या पदावरील नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः नियुक्ती २०१५/(प्र.क्र.७३/२०१५)/भाग-५/आ(सअश्रे-२)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
३ रा मजला,जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
तारीख: २१ जानेवारी, २०१६

संदर्भ: १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे क्र.३४७/(१)एक(१)(यां)/२०१४/तेरा-ब, दि.०७.०९.२०१५
२) शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१५/प्रक्र १५६/कार्या.२, दि.२८.०४.२०१५

शासन निर्णय

महाराष्ट्र अभियांत्रिकी(यांत्रिकी) सेवा परिक्षा २०१४ मधील सहायक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी) गट-ब या पदावरील नियुक्तीसाठी सरळसेवा भरतीद्वारे घेण्यात आलेल्या एकत्रित स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालावर आधारित महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये, सहायक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी) पदावर नियुक्तीसाठी शिफारसप्राप्त १४७ उमेदवारांपैकी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट- ब मधील सद्यस्थितीत नियुक्तीस पात्र ठरलेल्या एकूण १३८ उमेदवारांची जलसंपदा विभागात ते रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी सहायक अभियंता श्रेणी-२ (यांत्रिकी) म्हणून रुपये ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४४०० या वेतनश्रेणीत त्यांच्या नावासमोरील परिशिष्ट-अ मधील स्तंभ ७ व परिशिष्ट-ब मधील स्तंभ ६ मध्ये नमूद केलेल्या महसूली विभागात नियुक्ती करण्यात येत आहे.

२. परिशिष्ट-अ व ब मधील उमेदवारांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम २०१५ लागू राहील. सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये वाटप केलेल्या महसूली विभागानुसार श्रीमती सजगाणे किर्ती आबा (गु.क्र.१०९) यांना उप सचिव (मोप्र-१) मंत्रालय, मुंबई यांचेकडील रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येत आहे. उर्वरित १३७ उमेदवारांना सविस्तर पदस्थापना मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांनी द्याव्यात. सदर उमेदवारांची महाराष्ट्र अभियांत्रिकी (यांत्रिकी), सेवा वर्ग-२ जलसंपदा विभागातील पदस्थापना ही अंतिम असून त्यात बदल होणार नाही.

३. सदर उमेदवारांची ज्येष्ठता शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही १०७६/१२, दि.२१.६.१९८२ अन्वये विनियमित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ता क्रमांकानुसार निश्चित करण्यात येईल.

४. महाराष्ट्र अभियांत्रिकी(यांत्रिकी) सेवा वर्ग-२ गट-ब मधील उमेदवारांची नियुक्ती ही दोन वर्षाचा परिविक्षाकाळ समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील विहित शर्तीच्या अधीन असेल.

अ) परिशिष्ट-अ व ब मधील उमेदवारांनी खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सविस्तर नियुक्ती मिळण्यासाठी मुख्य अभियता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांच्याकडे हे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष संपर्क साधावा व सेवेत रुजू व्हावे.

ब) उमेदवारांनी नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यांच्या आत त्यांच्या नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले पाहिजे. अन्यथा एक महिन्यानंतर सदर नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. कार्यालय प्रमुखांनी एक महिन्यानंतर रुजू होणा-या अभियंत्यास रुजू करुन घेवू नये.

क) विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास उमेदवारांनी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अर्ज सादर करावा. नियुक्तीच्या आदेशानुसार एक महिन्याच्या आत सेवेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल ; त्यांची ज्येष्ठता ते ज्या दिनांकास शासन सेवेत रुजू होतील, त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल. उचित कारणास्तव मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाचा राहिल. विहित मुदतीत शासन सेवेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील.

ड) मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांना असे कळविण्यात येते की, परिशिष्ट-अ व ब मधील उमेदवारांच्या नियुक्तीचे कार्यालय/पदस्थापना दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापनेचे सविस्तर आदेश या आदेशाच्या दिनांकापासून ३ दिवसांत काढावेत व त्याबाबतचा अहवाल शासनास तात्काळ पाठविण्यात यावा. शासन आदेशात नमूद केल्यानुसार विभागीय संवर्ग वाटपाद्वारे मंजूर केलेल्या महसूली विभागात व पदस्थापनेच्या ठिकाणात कोणताही बदल करण्यात येवू नये अन्यथा संबंधितांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. तसेच, सदर आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी त्यांची सर्व संबंधित मुळ कागदपत्रे तपासून रुजू करुन घ्यावे.

५. वैद्यकीय तपासणी अहवाल अप्राप्त असलेल्या उमेदवारांना ६ महिन्यांच्या आत वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

६. चारित्र्य तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त असणाऱ्या उमेदवारांना सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०९.०१.२००९ च्या शासन निर्णयान्वये चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त होण्याच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे. सदर उमेदवारांची चारित्र्य पडताळणी नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात यावी. ६ महिन्यांच्या आत चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच, अहवाल असमाधानकारक असल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता १ महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

७. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांनी जातीचा दावा संबधित विभागीय जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र शासनास व संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करणे आवश्यक राहिल.

८. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित जागेवर शिफारस झालेल्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ देण्यासाठी त्यांनी सादर केलेली नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रे महिला व

बालविकास आयुक्तालय, पुणे यांच्या कडून तपासणीअंती वैध ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

९. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.३०.५.२००५ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग अथवा सक्षम प्राधिका-यांकडून खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरीता ज्या खेळाडूंची शिफारस होईल त्यांचे प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदाकरिता केलेला अर्ज संबंधित विभागांनी संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार शिफारस प्राप्त उमेदवारांपैकी खेळांडूच्या आरक्षित पदांवर निवड झालेल्या ७ उमेदवारांपैकी १ उमेदवार प्रत्यक्ष खेळाडू असून १ उमेदवाराची (श्री.यादव वैभव रमेश, गु.क्र.८०) यांनी साक्षांकन नमुना व इतर आवश्यक कागदपत्रे शासनास सादर केलेली नाहीत. उर्वरित ६ उमेदवारांपैकी खालील नमूद ३ उमेदवारांचे क्रिडा प्रमाणपत्र या पदासाठीची अर्हता पूर्ण करीत नसल्याचे आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांनी दि.१८/१२/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे त्यांना नियुक्ती देण्यात आलेली नाही.

अ.क्र.	नाव	गु.क्र.	अभिप्राय
१	श्री.राजकुमार मोहनराव देशमुख	११३	अर्हता पूर्ण करत नाही.
२	श्री.राकेश महाविर पाल	१३२	
३	श्री.प्रशांत संपतराव वारभुवन	१४४	

खेळाडू आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उर्वरित ३ उमेदवारांना शासन निर्णय, शाळेय शिक्षण व क्रिडा विभाग, दि.३० एप्रिल, २००५ मधील ७ (१७) नुसार आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, पुणे यांचा पडताळणी अहवाल प्राप्त होण्याच्या अटीच्या अधिन राहून ६ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

१०. आवश्यकता भासल्यास परिशिष्ट-अ व परिशिष्टब मधील उमेदवारांना भारताच्या संरक्षण सेवेतील पदावर किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या कुठल्याही पदावर देशात किंवा परदेशात प्रशिक्षणाचा कालावधी धरुन चार वर्षापेक्षा कमी नसणाऱ्या कालावधीसाठी भारत सरकार ठरविल त्या शर्तीवर सेवा करावी लागेल. परंतु

(अ) त्यांच्या नियुक्तीनंतर १० वर्षाचा कालावधी संपल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही किंवा

(ब) सर्वसाधारणपणे त्यांच्या वयाची ४० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांना अशी सेवा करावी लागणार नाही.

११. परिशिष्ट-अ व परिशिष्ट -ब मधील उमेदवारांनी हिन्दी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल किंवा भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर यासंबंधी असलेल्या नियमानुसार भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

१२. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांनी शासनाने विहित केलेली संगणक परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केली नसेल तर शासनाने विहित केलेली संगणक परीक्षा या संबंधी असलेल्या नियमानुसार उत्तीर्ण करावी लागेल.

१३. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांची सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा देऊ इच्छित असल्यास, त्यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/ प्र.क्र.३३/ ९२/८, दिनाक २/१२/९७ मधील तरतूदीनुसार शासनाला किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक असल्याची तरतूद आहे. त्यानुसार नियुक्त्या दिलेल्या उमेदवारांचे राजीनामे स्विकारण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-यास म्हणजेच सचिव,जलसंपदा विभाग,मंत्रालय यांना असतील. क्षेत्रिय कार्यालयांनी परस्पर प्रशिक्षणार्थ्याचा राजीनामा स्विकृत करू नये किंवा मंजूर करू नये. मात्र, गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी नोटीस देण्याचे बंधन शासनावर राहणार नाही.

१४. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणासंबंधी, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक:टीआरएन-०९/ प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३ सप्टेंबर,२०११ मधील परिच्छेद सहा येथील तरतुदीनुसार प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी प्रशिक्षणार्थीस सक्षम प्राधिकाऱ्यास बंधपत्र लिहून द्यावे लागेल. त्याप्रमाणे जर एखादा प्रशिक्षणार्थी त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधीत नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम प्रशिक्षणार्थीकडून वसूल करून संबंधित प्राधिकाऱ्याला प्रथम शासनाकडे जमा करावी लागेल. याबाबतचे दर शासन निश्चित करेल.

(अ) त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणासाठी हजर होतेवेळी मुख्य अभियंता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्याकडे, मुख्य अभियंता(यांत्रिकी),जलसंपदा विभाग,नाशिक व नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे बंधपत्र भरून सादर करणे बंधनकारक राहील.

(ब) शासनाने निश्चित केलेल्या प्रशिक्षणासाठीच्या दराप्रमाणे शुल्क भरल्यानंतरच संबंधित प्रशिक्षणार्थ्यांना नोकरी सोडून जाता येईल.

१५. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक अभियंता यांनी सेवेत दाखल होणाऱ्या उमेदवारांचे ते हजर झाल्याचा दिनांकाचा अहवाल शासनाला व मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांना तात्काळ सादर करावा.

१६. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवार ३० दिवसांच्या मुदतीत/विहित कालाधीत हजर/रुजू न झाल्याबाबतचा अहवाल संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांनी शासनाला व मुख्य अभियंता महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

१७. संबंधित अधिकाऱ्यांनी उमेदवार रुजू झाल्यानंतर त्यांची वैयक्तिक माहिती आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह (२ प्रती) शासन ज्ञापन, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीआरएफ १२६५/डी-१/२९/११/६५ अनुसार शासनास पाठवावी. तसेच फॉर्म क्रमांक पार्ट एफजीईएन २५४/(सी)(आऊटर कव्हर) मध्येही दोन प्रतीत माहिती शासनास पाठवावी.

१८. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब ब मधील उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवून विभाग प्रमुखांनी याबाबत मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक व शासनास कळवावे.

१९. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक/अधीक्षक अभियंता यांनी परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांचा परिविक्षाधीन कालावधी संपण्याच्या एक महिना अगोदर त्यांचे

परिविक्षाधीन काळातील विशेष मुल्यनिर्धारण अहवाल शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०६२/डी, दिनांक २६/४/६२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात तीन प्रतीमध्ये शासनास पाठवावेत.

२०. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवार जर सध्या जलसंपदा विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा शासनाच्या इतर विभागात काम करीत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक / संबंधित अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांना सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही.

२१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये उमेदवाराना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल, भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असतील त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अंनियो १००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी २००७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरीसेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठवावा.

२२. वरीलपैकी जे उमेदवार सेवेत हजर होतील त्यांचे बाबतचा एकत्रित अहवाल तसेच जे हजर होणार नाहीत त्यांचा गोषवारा व परिच्छेद ११ येथे नमूद केल्याप्रमाणे प्रशिक्षणार्थीकडून घेतलेले बंधपत्र एकत्रितरीत्या मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांनी तात्काळ शासनास सादर करावे.

२३. तसेच प्रशिक्षणा दरम्यान सर्व प्रशिक्षणार्थीकडून प्रबोधिनीच्या प्रशिक्षणबाबतच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्यांच्याकडून नियमभंग झाल्यास प्रबोधिनीकडून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

२४. परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांनी विहित विभागीय परीक्षा परिविक्षाधीन कालावधीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच परिविक्षाधीन कालावधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास त्यांच्या सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द् करण्यात येतील.

२५. परिशिष्ट -अ व परिशिष्ट-ब मधील उमेदवारांनी नियुक्ती दिलेल्या कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांनी तात्काळ सोबतचे पत्र संबधित मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक / संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या स्वाक्षरीसह या विभागाकडे पाठवावे. अन्यथा त्यांना दिलेली नियुक्ती त्यांनी स्विकारलेली नाही असे समजून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

२६. विशिष्ट ठिकाणी पदस्थापना / बदली / नियुक्ती मिळविण्यासाठी खासदार/आमदार/ लोकप्रतिनिधी/ खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबधित उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२०१५४५३३३४२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Popat Gangaram Tande

Digitally signed by Popat Gangaram Tande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Popat Gangaram Tande
Date: 2016.01.21 15:24:37 +05'30'

(पो.गं.तंडे)

शासनाचे अवर सचिव

सहपत्र : परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. सचिव(ज.सं.व्य व लाक्षेवि),जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२, मंत्रालय,मुंबई.
४. महालेखापाल-१/२(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
५. महालेखापाल-१/२(लेखा परिक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/ नागपूर.
६. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राने)
७. मुख्य अभियंता(यांत्रिकी),जलसंपदा विभाग, नाशिक.
८. मुख्य अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक.
९. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक.
१०. अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, मेरी नाशिक. (प्रशासन अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.)
११. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
१२. मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. संबधित उमेदवार श्री/श्रीमती. (यादीनुसार)
१४. आ(स.अ.श्रे.-२) कार्यासन संग्रहार्थ.

परिशिष्ट - अ

अपंग प्रवर्गातून निवड झालेले उमेदवार

शासन निर्णय क्र.नियुक्ती २०१५/(७३/२०१५)/भाग-५/आ(स.अ.श्रेणी-२), दि.२१/०१/२०१६ सोबतचे सहपत्र

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्ती चा प्रवर्ग	उमेदवारांनी दिलेला विकल्प	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६	७
१	शेळके महेश सत्यवान	८७	खुला (अपंग)	खुला (अपंग)	पुणे	पुणे
२	मांजरे आप्पासाहेब बाळासाहेब	९४	खुला (अपंग)	खुला (अपंग)	पुणे	पुणे
३	डहाके महेंद्र एकनाथ	११९	इ.मा.व. (अपंग)	इ.मा.व. (अपंग)	नागपूर	नागपूर
४	कोल्हे अजय विश्वनाथ	१२४	खुला (अपंग)	खुला (अपंग)	अमरावती	अमरावती

Popat Gangaram Tande

Digitally signed by Popat Gangaram Tande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Popat Gangaram Tande
Date: 2016.01.21 15:25:06 +05'30'

(पो.गं.तंडे)

शासनाचे अवर सचिव

परिशिष्ट – ब

शासन निर्णय क्र.नियुक्ती २०१५/(७३/२०१५)/भाग-५/आ(स.अ.श्रेणी-२), दि.२१/०१/२०१६ सोबतचे सहपत्र

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
१	बाविस्कर राहुल विष्णुदास	१	इ.मा.व	खुला	नागपूर
२	ओलेकर सागर शिवाजी	२	भ.ज.क	खुला	अमरावती
३	सावंत आनंद तानाजी	३	खुला	खुला	औरंगाबाद
४	गुंड स्वप्निल कल्याणराव	४	खुला	खुला	नाशिक
५	बोंगाणे चंद्रशेखर मंसुबराव	५	खुला	खुला	नागपूर
६	थोरात अजिंक्य शिवाजी	६	खुला	खुला	अमरावती
७	मंटलवाड व्यंकटेश नरसिंगराव	७	वि.मा.प्र.	खुला	औरंगाबाद
८	उस्मानी महम्मद शाहिद अफजल अहमद	८	खुला	खुला	नाशिक
९	आगाशे निलेशकुमार भाऊराव	९	इ.मा.व	खुला	नागपूर
१०	हेगडकर अमोल सुभाष	१०	भ.ज.क	खुला	अमरावती
११	साव प्रविण किशोर	११	इ.मा.व	खुला	औरंगाबाद
१२	रोकडे सागर वसंत	१२	अ.जा.	खुला	नाशिक
१३	जाधव किरण मारूती	१४	खुला	खुला	नागपूर
१४	ठाकुर लुपेश केशव	१५	इ.मा.व	खुला	अमरावती
१५	गिराम गोंविंद संभाजी	१६	खुला	खुला	औरंगाबाद
१६	कुंभार संदिप रामचंद्र	१७	इ.मा.व	खुला	नाशिक
१७	चिकाटे अभिनव अशोक	१८	अ.जा.	खुला	नागपूर
१८	गवारे दिपक श्रीरंग	१९	खुला	खुला	अमरावती
१९	शिदोरे अनिल विष्णु	२०	इ.मा.व	खुला	औरंगाबाद
२०	कोलवाले तात्या दत्तात्रय	२१	खुला	खुला	नाशिक
२१	जाधव अमित किसन	२२	खुला	खुला	नागपूर
२२	भोसले उदयसिंह दिगंबर	२३	खुला	खुला	अमरावती
२३	आसाबे सुनिल मधुकर	२४	खुला	खुला	औरंगाबाद
२४	घोरमाडे सागर विकासराव	२५	इ.मा.व	खुला	नाशिक
२५	हेगडे वैभव पोपट	२६	इ.मा.व	खुला	नागपूर
२६	रोकडे आशिष विद्याधन	२७	इ.मा.व	खुला	अमरावती
२७	नौकुडकर सागर तानाजी	२८	खुला	खुला	औरंगाबाद
२८	काशिद योगेश सर्जेराव	२९	खुला	खुला	नाशिक

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
२९	राजे विक्रम विलास	३०	इ.मा.व	खुला	नागपूर
३०	खैरनार भुषण भारत	३१	इ.मा.व	खुला	अमरावती
३१	पाटील दिपक सोपान	३२	इ.मा.व	खुला	औरंगाबाद
३२	निकुंभ महेश साहेबराव	३३	इ.मा.व	खुला	नाशिक
३३	कुलकर्णी अनिरुद्ध गोपाळकृष्ण	३४	खुला	खुला	नागपूर
३४	रेवगडे रोहित विश्राम	३५	खुला	खुला	अमरावती
३५	किर अक्षय तुषार	३६	खुला	खुला	औरंगाबाद
३६	नकाते संजय शिवाजी	३७	खुला	खुला	नाशिक
३७	देशट्टीवार अनिकेत बबनराव	३८	भ.ज.ब.	खुला	नागपूर
३८	सोनावणे सुशांत शामकांत	३९	इ.मा.व	खुला	अमरावती
३९	गायकवाड प्रसाद तानाजी	४१	खुला	खुला	औरंगाबाद
४०	शेख आरिफ अहमद	४२	खुला	खुला	नाशिक
४१	शिरसाठ महेश दत्तात्रय	४३	खुला	खुला	नागपूर
४२	पाटील सागर शरद	४४	इ.मा.व	इ.मा.व	अमरावती
४३	मात्रे श्रीनिवास ज्ञानोबा	४५	भ.ज.क.	भ.ज.क.	औरंगाबाद
४४	सातपुते अमोल नंदकुमार	४६	इ.मा.व	इ.मा.व	नाशिक
४५	कापडनीस मनोज रमेश	४७	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
४६	धस संजय बळीराम	४८	भ.ज.ड	भ.ज.ड	अमरावती
४७	दवंड अकुंश रामकृष्ण	४९	इ.मा.व	इ.मा.व	औरंगाबाद
४८	शेंडे चक्रेश यशवंत	५०	भ.ज.ब.	भ.ज.ब.	नाशिक
४९	बुरूंगले दत्तात्रय भानुदास	५१	भ.ज.क.	भ.ज.क.	नागपूर
५०	शिंगारे अविनाश भारतराव	५२	इ.मा.व	इ.मा.व	अमरावती
५१	हजारे मनोज साहेबराव	५३	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
५२	पिंपळे अमोल रघुनाथ	५४	इ.मा.व	इ.मा.व	नाशिक
५३	बोडखे दिपक शिवराम	५५	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
५४	कागणे प्रकाश गंगाधर	५६	भ.ज.ड	भ.ज.ड	अमरावती
५५	रत्नपारखी रविप्रसाद दिनकर	५७	इ.मा.व	इ.मा.व	औरंगाबाद
५६	दिवेकर अनिकेत अशोक	५८	अ.जा.	अ.जा.	नाशिक
५७	साठे सिध्दांत शिवाजी	५९	अ.जा.	अ.जा.	नागपूर
५८	कटवटे रोहन राजेंद्र	६०	भ.ज.ब.	भ.ज.ब.	औरंगाबाद

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
५९	घोलप निलेश मल्हारी	६१	भ.ज.क.	भ.ज.क.	नाशिक
६०	तायडे उमेश रामराव	६२	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
६१	काकडे भुषण वासुदेवराव	६३	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
६२	तांबोळी शाहिद चंद	६४	इ.मा.व	इ.मा.व	नाशिक
६३	देसले योगेश भास्करराव	६५	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
६४	दामधर भास्कर पांडुरंग	६६	इ.मा.व	इ.मा.व	औरंगाबाद
६५	साळुंके सचिन युवराज	६७	अ.ज.	अ.ज.	नाशिक
६६	ठाकरे पंकज शंकरराव	६८	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
६७	मेश्राम थामस शंकर	६९	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
६८	ठाकरे हर्षद दिगंबर	७०	इ.मा.व	इ.मा.व	नाशिक
६९	कौले मनोज साधु	७१	इ.मा.व	इ.मा.व	नागपूर
७०	पारधी शैलेश दिवानजी	७२	इ.मा.व	इ.मा.व	औरंगाबाद
७१	सपकाळे विनोद दामु	७३	वि.मा.प्र.	वि.मा.प्र.	नाशिक
७२	कंजारे सिद्धेश्वर खंडप्पा	७४	अ.जा.	अ.जा.	नागपूर
७३	रामटेके प्रमोद चरणदास	७५	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
७४	वानखेडे विशाल बाजीराव	७६	अ.जा.	अ.जा.	नागपूर
७५	आगवणे गिरीश बबनराव	७७	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
७६	अंबलकर मोहन शंकर	७८	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
७७	बावनगडे सचिन कमलाकर	७९	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
७८	कांबळे रविंद्र अशोक	८१	भ.ज.ब.	भ.ज.ब.	औरंगाबाद
७९	तायडे आनंद प्रकाशराव	८२	अ.जा.	अ.जा.	औरंगाबाद
८०	वर्मा भगवानसाय सखाराम	८४	अ.ज.	अ.ज.	औरंगाबाद
८१	चव्हाण सहदेव कुशाबा	८५	वि.जा.अ.	वि.जा.अ.	औरंगाबाद
८२	राठोड भुपेंद्र आत्माराम	८६	वि.जा.अ.	वि.जा.अ.	औरंगाबाद
८३	जाधव अभिरुची मनोहर	८८	अ.जा.(महिला)	अ.जा.(महिला)	औरंगाबाद
८४	महाले अनिल अशोक	८९	इ.मा.व (खेळाडू)	इ.मा.व (खेळाडू)	औरंगाबाद
८५	जाधव प्रेम दिलीप	९०	वि.जा.अ.	वि.जा.अ.	औरंगाबाद
८६	शिंदे अनिल लक्ष्मण	९१	वि.जा.अ.	वि.जा.अ.	औरंगाबाद
८७	खांडवी सुनिल अरुण	९२	अ.ज.	अ.ज.	कोकण
८८	गावित नितिन बळवंत	९३	अ.ज.	अ.ज.	पुणे

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
८९	पाटील पूनम संभाजी	९५	खुला (महिला)	खुला (महिला)	कोकण
९०	बो-हाडे गोरखनाथ दामू	९६	अ.ज.	अ.ज.	पुणे
९१	पगार वर्षा दादाजी	९७	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	कोकण
९२	पाटील निशा राजाराम	९८	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
९३	बनोदे मदुरा विजय	१००	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	कोकण
९४	मडावी श्रीकांत कवडु	१०१	अ.ज.	अ.ज.	पुणे
९५	टिकेकर प्रियांका चंद्रकांत	१०२	वि.मा.प्र. (महिला)	वि.मा.प्र. (महिला)	कोकण
९६	कापसे अपेक्षा कुबेरदास	१०३	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
९७	शेख सुमैय्या साहेब	१०४	खुला (महिला)	खुला (महिला)	कोकण
९८	बागडे श्रुती सुदाम	१०६	अ.जा.(महिला)	अ.जा.(महिला)	पुणे
९९	घाडगे सायली विठ्ठलराव	१०७	खुला (महिला)	खुला (महिला)	कोकण
१००	भिनगुडे उज्ज्वला लक्ष्मण	१०८	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१०१	सजगाणे किर्ती आबा	१०९	भ.ज.क. (महिला)	भ.ज.क. (महिला)	कोकण (मंत्रालय, मुंबई येथील रिक्त पदावर)
१०२	धुम विलास पांडुरंग	११०	अ.ज.	अ.ज.	पुणे
१०३	भुजबळ सुप्रिया अशोक	१११	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	पुणे
१०४	खडके अविनाश मारुती	११२	अ.ज.	अ.ज. (महिला ऐवजी)	पुणे
१०५	पाटील पुजा दिपक	११४	भ.ज.क. (महिला)	भ.ज.क. (महिला)	पुणे

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
१०६	गोरे चैताली आनंदराव	११५	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	पुणे
१०७	सोनावणे शुभांगी कचरु	११६	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	पुणे
१०८	तायडे भारती अशोक	११७	अ.जा.(महिला)	अ.जा.(महिला)	पुणे
१०९	पारधी शेफाली दयानंद	११८	इ.मा.व. (महिला)	इ.मा.व. (महिला)	पुणे
११०	नाईकरे शितल दादासाहेब	१२०	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१११	लोंढे राधिका बाळासाहेब	१२१	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
११२	कोरके सुप्रिया सुरेश	१२२	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
११३	घोरमोडे दिक्षा महादेव	१२३	इ.मा.व.(महिला)	इ.मा.व.(महिला)	पुणे
११४	बोडके युगंधरा दिलीप	१२५	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
११५	दराडे प्रज्ञा महारुद्र	१२६	भ.ज.ड.(महिला)	भ.ज.ड.(महिला)	पुणे
११६	खंदारे स्नेहल विठ्ठल	१२७	अ.जा. (महिला)	अ.जा. (महिला)	पुणे
११७	नरके स्नेहल बाबुराव	१२८	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
११८	लाडे कृतिका बबनराव	१२९	भ.ज.ब. (महिला)	भ.ज.ब. (महिला)	पुणे
११९	व्यवहारे दुर्गा शंकर	१३०	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२०	पाटील दिपाली धोंडीराम	१३१	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२१	मोटघरे रोशना तुकाराम	१३३	अ.जा. (महिला)	अ.जा. (महिला)	पुणे

अ.क्र.	नाव	मलोआ गुणवत्ता क्र.	जात प्रवर्ग	नियुक्तीचा प्रवर्ग	वाटप केलेला महसूली विभाग
१	३	२	४	५	६
१२२	कुलकर्णी अमृता मुरलीधर	१३४	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२३	झाडे अमित केशवराव	१३५	खुला (खेळाडू)	खुला (खेळाडू)	पुणे
१२४	अहिवाळे प्राची लक्ष्मण	१३६	अ.जा. (महिला)	अ.जा. (महिला)	पुणे
१२५	धुमाळ मनिषा चंद्रकांत	१३७	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२६	मगर निशिगंधा श्रावणराव	१३८	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२७	म्हस्के प्रियांका यादव	१३९	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२८	चव्हाण अर्चना एकनाथ	१४०	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१२९	चोरगे रश्मी पांडुरंग	१४१	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१३०	भालेराव श्रद्धा बाळासाहेब	१४२	अ.ज. (महिला)	अ.ज. (महिला)	पुणे
१३१	लोंढे अवनी बाळासाहेब	१४३	खुला (महिला)	खुला (महिला)	पुणे
१३२	धुर्वे निशांत मनोहर	१४५	अ.ज. (खेळाडू)	अ.ज. (खेळाडू)	पुणे
१३३	पवार ज्योत्सना मानसिंग	१४६	वि.जा.अ. (महिला)	वि.जा.अ. (महिला)	पुणे
१३४	चौधरी प्रेमा पुंडलिक	१४७	अ.ज. (महिला)	अ.ज. (महिला)	पुणे

Popat Gangaram Tande

Digitally signed by Popat Gangaram Tande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Popat Gangaram Tande
Date: 2016.01.21 15:25:40 +05'30'

(पो.गं.तंडे)

शासनाचे अवर सचिव